# स्वच्छतेची शपथ

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

महात्मा गांधींनी ज्या भारताचे स्वप्न पाहिले होते त्यामध्ये केवळ राजनैतिक स्वातंत्र्यच नव्हते तर एक स्वच्छ व विकसित देशाची कल्पनाही होती. महात्मा गांधींनी गुलामीतून भारतमातेला मुक्त करुन स्वातंत्र्य मिळवून दिले.

आता भारतमातेला अस्वच्छतेतून मुक्ती देऊन देशाची सेवा करणे आपले आद्य कर्तव्य आहे. मी शपथ घेतो की, मी स्वत: स्वच्छतेच्या बाबतीत जागरुक राहिल आणि त्यासाठी वेळही देईल. दरवर्षी १०० तास म्हणजेच प्रत्येक आठवडयातून दोन तास श्रमदान करुन स्वच्छतेच्या या संकल्पाला पूर्ण करीन.

मी स्वत: घाण करणार नाही, आणि दुसऱ्यालाही करु देणार नाही.
सर्वप्रथम मी स्वत:पासून, माझ्या कुटुंबापासून, माझ्या गल्ली/वस्तीपासून,
माझ्या गावापासून तसेच माझ्या कार्यस्थळापासून
या कामास सुरुवात करेन.

मला हे मान्य आहे की, जगामधील जे देश स्वच्छ आहेत,
त्याचे कारण त्या ठिकाणचे नागरिक स्वत:
घाण करीत नाही व घाण करु देत नाहीत.

या विचारांनी मी गावोगावी आणि गल्लोगल्ली
स्वच्छ भारत मिशनचा प्रचार करेन.
मी आज जी शपथ घेत आहे, ती आणखी शंभर
लोकांनाही घ्यायला लावेल.
तेही माझ्यासारखेच स्वच्छतेसाठी १०० तास
देतील यासाठी मी प्रयत्न करेन.

मला माहीत आहे की, स्वच्छतेच्या दिशेने
टाकलेले माझे हे एक पाऊल संपूर्ण भारत
देशाला स्वच्छ करण्यासाठी मदत करेल.



महाराष्ट्र शासन
तंत्रशिक्षण संचालनालय
राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

**तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई**